## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## प्रेस नोट दिनांक १९/०३/२०१९

चंदननगर पो. स्टे. गु.र.नं.७०/२०१९ भा.द.वि.क. ३८०,३४ मधील फिर्यादी राजेंद्र सुभाष कर्नावट,वय-४० वर्षे धंदा-नोकरी रा.प्लेट नं.२६,साई अपार्टमेंट,स.न.४६/२,चंदननगर खराडी पुणे यांचे भांबुर्डेकर सराफ अॅन्ड ज्वेलर्स (बीएजे) पहीला मजला शॉप नं.२,ब्रम्हा मेंडर, रेडीसन हॉटेल समोर खराडी पुणे मध्ये दिनांक ०५/२/२०१९ रोजी १७.०० वा ते १८/०० वा चे दरम्यान दोन अनोळखी महीला व एक अनोळखी पुरुष इसमांनी आपआपसात संगणमत करुन चैन खरेदी करण्याचे बहाण्याने दुकानामध्ये येवून महीला स्टाफला चैन दाखविण्यास सांगुन नजर चुकवून १,२७,०००/- एक सोन्याची चैन वजन ४०.९७ ग्रॅम वजनाची पोकळ रोझो नावाची डिझाईन असलेली चेन चोरी करुन स्टाफच्या संमतीशिवाय चोरी केलेने वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

चंदननगर पो. स्टे. चे वपोनि. कृष्णा इंदलकर यांनी गुन्हयाचे तपासामध्ये दिलेल्या सुचनांवरुन तपास पथकाचे कर्मचारी पो.हवा. अजित धुमाळ, राजेंद्र दिक्षीत, पंडीत गावडे, पो.ना चेतन गायकवाड, तुषार खराडे, प्रदीप सोनवणे, शकुर पठाण, अमोल गायकवाड व पो.शि किरण पलांडे यांनी संशयीत इसम नामे १) विशाल रणवीर चव्हाण वय-२५ वर्षे रा. प्लॉट नं २८९, भंडारा रोड, मिरची बाजार, इतवारी हनुमान मंदीराजवळ नागपुर व मुळगाव नवी डिगंळी नागपुर याचा शोध घेणे कामी सोलापुर, अहमदनगर, नागपुर येथे जाऊन त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास दि.१६/०३/२०१९ रोजी चंदननगर पोलीस ठाणे येथे हजर केल्याने दाखल गुन्हयाचे अनुषंगाने कसोशिने तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार महीला आरोपी १) एक महिला,वय-४८ वर्ष,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे २)एक महिला,वय-६० वर्ष,रा. सुखसागरनगर, बिबवेवाडी,पुणे यांचेसोबत केल्याचे सांगुन सदर महिलांना त्यांचे राहाते पत्यावर जाऊन शोध घेतला असता ते मिळुन आल्याने व त्यांचे गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन अटक आरोपी यांनी पुणे शहर परिसरामध्ये आणखी गुन्हे केलेचे निष्पन्न होत असुन त्याबाबत त्यांचेकडे पोलीस कस्टडीमध्ये अधिक तपास करीत आहोत.

सदरची कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ४, श्री. अक्कानवरू, मा. सहा पोलीस आयुक्त सो, येरवडा विभाग श्री. पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पो.हवा. अजित धुमाळ, राजेंद्र दिक्षीत, पंडीत गावडे, पो.ना चेतन गायकवाड, तुषार खराडे, प्रदीप सोनवणे, शकुर पठाण, अमोल गायकवाड व पो.शि किरण पलांडे यांनी केलेली आहे.